वर्ष-०८ | अंक-३० | मुंबई, मंगळवार १४ ते २० जून - २०२२ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

पोलीस बातमी पत्र

POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

PG 2
डोंबिवलीत धनप्राप्तीसाठी मुंगूस पाळणाऱ्या व्यावसायिकावर वनविभागाकडून कारवाई

3 → वाहनचालकांमध्ये फिल्मी स्टाईल राडा; चाकू हल्ल्याचा थरार सीसीटीव्हीत कैद

कल्याणमध्ये पदपथांवरील बेकायदा टपऱ्या ← 4

# आमच्या हातात ईडी द्या, फडणवीसही शिवसेनेला मतदान करतील : संजय राऊत



मुंबई :राज्यसभा निवडणुकीवर शिवसेनेने भाजपला पुन्हा डिवचले आहे. केंद्रीय तपास यंत्रणांना हाताशी धरुन भाजप निवडणुका जिंकण्याचा डाव टाकत आहे, अशी टीका शिवसेना नेते संजय राऊत यांनी केली आहे. आमच्या हातात जर ईडी दिली तर देवेंद्र फडणवीसही शिवसेनेला मतदान करतील, असा जोरदार टोला संजय राऊत यांनी केंद्रातील भाजप सरकारला हाणला.

राज्यसभा निवडणुकीत सहाव्या जागेवर पराभव झाल्यानंतर शिवसेना नेते संजय राऊत यांनी पुन्हा एकदा भाजपवर हल्लाबोल चढवला आहे. महाराष्ट्रासह देशभरात निवडणुकीचं जे चित्र स्पष्ट झाले त्यात काही नवे नाही. केंद्र सरकारकडून शासकीय यंत्रणांचा गैरवापर केला जात आहे. आमच्याकडेही यंत्रणा आहे, मात्र ईडी नसल्याचा खोचक टोला त्यांनी यावेळी भाजपला लगावला. कोणत्याही अपक्षांचा अवमान करण्याचा प्रश्न नाही. आता निवडणूक झाली आहे. त्यामुळे तो विषय संपल्याचे सांगत राज्यसभेतील पराभवाच्या प्रश्नावर बोलण्याचे त्यांनी टाळले.

महाराष्ट्रात रात्रीच्या अंधारात निवडणूक आयोगाला हाताशी धरुन राज्यातले नेते काय करत होते, गृहखात्याचे कसे फोन येत जात होते, हे आम्हाला माहिती आहे. यंत्रणा आमच्याकडेही आहे, असे राऊत म्हणाले. त्याचवेळी ते म्हणाले, आमच्या हाती 48 तासांसाठी ईडी दिली तर फडणवीसही शिवसेनेला मतदान करतील, अशी बोचरी टीका संजय राऊत यांनी केली आहे. केंद्रीय तपास यंत्रणा ईडीच्या माध्यमातून विजय संपादन करण्यात आला आहे.

दरम्यान, पंकजा मुंडे यांना भाजपमध्ये एकाकी पाडण्याचा फडणवीस यांचा डाव आहे, अशी टीका राऊत यांनी केली. पंकजा मुंडे आणि शिवसेनेचे जिव्हाळ्याचं नाते आहे. आम्हाला पंकजा मुंडे यांची चिंता करण्याचा अधिकार आहे, अशी भूमिका राऊत यांनी माध्यमांसमोर मांडली.

# पार्सल द्यायला उशीर झाल्याने चायनीज विक्रेत्यावर हल्ला, उल्हासनगर हादरले

उल्हासनगर : उल्हासनगरात एका किरकोळ कारणावरून गावगुंडांनी एका चायनीज विक्रेत्यावर हल्ला केला. पार्सल द्यायला उशीर झाल्यानं गावगुंडांनी चायनीज विक्रेत्यासह त्याच्या जावयावर जीवघेणा हल्ला चढवला. विठ्ठलवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील व्हीनस चौकात घडलेल्या या घटनेमुळं उल्हासनगरात कायदा सुव्यवस्थेचे तीनतेरा वाजल्याचं पाहायला मिळतंय. तर या घटनेप्रकरणी विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करून तीन जणांना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. या तिघांनाही सध्या पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. त्यांच्या उर्वरित साथीदारांचा शोध सुरू असल्याची माहिती विठ्ठलवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय गायकवाड यांनी दिली आहे.



उल्हासनगरच्या कॅम्प ४ मधील विठ्ठलवाडी पोलीस स्टेशनच्या हद्दीत व्हीनस चौक परिसर येतो. या चौकात दर्शन राय यांचं मनोज कोळीवाडा हे चायनीजचं दुकान आहे. या दुकानात १२ जूनच्या रात्री सव्वाबारा वाजता ज्ञानेश्वर भोईर हा पार्सल घेण्यासाठी आला. मात्र तोवर दुकान बंद झालेलं असल्यानं राय यांनी त्याला १० मिनिटं थांबायला सांगितलं. मात्र १० मिनिटांत ...पान २ वर...

## बंद घर हेरुन टाकायच्या डल्ला

# तीन सख्ख्या बहिणींना पोलिसांनी ठोकल्या बेड्या

रिकामी घरे हेरून बनावट चावीने घराचे कुलूप उघडून घरफोडी करणाऱ्या तीन




सख्ख्या बहिणींना कल्याण क्राईम ब्रांचने बेड्या ठोकल्या आहेत. सारिका सकट, मिणा इंगळे आणि सुजाता सकट अशी तिन्ही बहिणींची नावे आहेत.

डोंबिवली येथे एका घरात चोरी करून या तिघी बहिणी आपल्या कुटुंबासह जेजुरी येथे देवदर्शनासाठी गेल्या होत्या. यावेळी सीसीटिव्ही फुटेज आणि तांत्रिक तपासाच्या आधारे या तिन्ही बहिणीना पोलिसांनी बेड्या ठोकल्या. त्यांच्याकडून 23 तोळे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. या तिघींनी आधी किती ठिकाणी घरफोड्या केल्या आहेत? याचा तपास पोलीस करत आहेत.

**असा लावला छडा!**

डोंबिवली पूर्व राम नगर परिसरात मधील बंद घरात चोरी झाली होती. चोरट्यांनी घरात कुणी नसल्याची संधी साधत बनावट चावीने दरवाजा उघडून घरातील 23 तोळे सोन्याचे दागिने चोरले होते. या प्रकरणी डोंबिवली रामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. इमारतीच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये चोरी करणाऱ्या तीन ...पान २ वर...

# पुणे पोलिसांना मोठं यश

## मुसेवाला प्रकरणातील शार्पशूटर संतोष जाधवला अटक



पुणे : सिध्दू मुसेवाला हत्याकांडातील संशयित शार्पशूटर संतोष जाधवच्या पुणे ग्रामीण पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. पुणे पोलिसांनी संतोषला गुजरातमधून अटक केली आहे. संतोष जाधवसह नवनाथ सुर्यवंशीलाही पोलिसांनी अटक केली आहे. संतोषला २०२१ मध्ये मंचर येथील बाणखेले खून प्रकरणात अटक करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. संतोष जाधवला रविवारी रात्री उशिरा न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यात आले असता २० जूनपर्यंत त्याला पोलीस कोठडी देण्यात आली आहे. दोन वर्षापासून खून केल्यानंतर संतोष जाधव आणि सौरभ महाकाळ फरार झाले होते. हे दोघंही पंजाबमध्ये राहत असल्याची माहिती ग्रामीण पोलिसांना मिळाली होती. हे दोघे ही लॉरेन्स बिष्णोईच्या टोळीमधील असल्याची माहिती समोल आली आहे. पुणे ग्रामीण पोलिसांनी पंजाब पोलिसांना सीसीटीव्ही पाहून संतोष जाधवची माहिती सांगितली होती.

गायक सिध्दू मुसेवाला याच्यावर हल्ला करण्याकरता सचिन बिश्नोई गँगने महाराष्ट्रातून दोन शार्प शूटर बोलावले होते. संतोष जाधव आणि महाकाल नावाचे हे दोन शूटर होते. ज्यांनी मुसेवालावर गोळीबार केला, यांची नावे पंजाब पोलिसांनी जाहीर केली. मुसेवालांची हत्या करण्यासाठी एकूण चार राज्यातून शूटर्स पंजाबमध्ये पाठवण्यात आले होते. ३ शूटर्स पंजाबमधील होते. २ महाराष्ट्रातले, २ हरियाणातले ...पान २ वर...

# नेपाळ सीमेवरुन दोन चीनी नागरिकांची भारतात घुसखोरी; एसएसबी जवानांकडून अटक



नेपाळ सीमेवरून बेकायदेशीररीत्या भारतात घुसलेल्या दोन चीनी नागरीकांना एसएसबीच्या जवानांनी अटक केली. गेले १५ दिवस ते बेकायदेशीररित्या भारतात फिरत होते. चौकशीदरम्यान दोघेही सीतामढीमार्गे भारतात दाखल झाले आणि खासगी कारने दिल्लीला गेल्याचे समोर आले आहे. १५ दिवस दिल्लीत फिरून ते नेपाळला परतत होते. यादरम्यान सीमेवर गस्त घालणाऱ्या एसएसबीच्या जवानांनी दोघांनाही अटक केली. एसएसबीच्या जवानांनी दोघांना बिहार पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. ३० वर्षीय लू लांग आणि ३२ वर्षीय यूआन हेलांग अशी अटक करण्यात आलेल्या नागरिकांची नावे आहेत. आर्थिक फसवणूक केल्याचा आरोपही त्यांच्यावर आहे. दोन्ही तरुणांकडे नेपाळला गेलेल्या व्हिसा क्रमांक EA5390986 आणि BA9887948 व्यतिरिक्त एक काळे कापड, दोन मोबाईल, मोबाईल पॉवर बँक, विविध कंपन्यांचे अर्धा डझन भारतीय सिम, १०३ डॉलर, पाचशे भारतीय चलन, एटीएम कार्ड, सिगारेट, औषध आणि इकॉनॉमी क्लासचा बोर्डिंग. पास आढळून आला आहे. दोन्ही तरुणांनी पोलीस चौकशीत सांगितले की, “ते चीनमधून थायलंडमार्गे काठमांडूला पोहोचले. तेथून ते सायकलने भिथामोड सीमेपर्यंत गेले. भारतीय हद्दीत आल्यानंतर त्यांनी २५ मे रोजी नोएडा येथील जेपी ग्रीन नावाच्या ठिकाणी भाड्याने कार घेतली. दोघे त्यांची दिल्लीतील मैत्रिणी कॅरीकडे गेले. त्यांची मैत्रीण कॅरी नोएडामध्ये मोबाईल फॅक्टरीसह टोन सांग रेन जियान नावाचा गाण्याचा क्लब देखील चालवते. तेथे १५ दिवस राहिल्यानंतर, कारने भिट्टामोरला परत आले.

# कराडमध्ये खुलेआम फिरणाऱ्या दोन तडीपार गुंडांना सातारा एलसीबीने ठोकल्या बेड्या

**तडीपार असतानाही कराड शहरात खुलेआम फिरणाऱ्या दोन गुंडांना सातारा स्थानिक गुन्हे शाखेने बेड्या ठोकल्या आहेत. प्रतिक विजय साठे आणि बजरंग उर्फ बज्या सुरेश माने (रा. बुधवार पेठ, कराड), अशी अटक करण्यात आलेल्या तडीपार गुंडांची नावे आहेत. त्यांना सहा महिन्यांसाठी सातारा आणि सांगली जिल्ह्यातील शिराळा, वाळवा आणि कडेगाव तालुक्यातून हद्दपार करण्यात आले होते.**



सातारा - तडीपार असतानाही कराड शहरात खुलेआम फिरणाऱ्या दोन गुंडांना सातारा स्थानिक गुन्हे शाखेने बेड्या ठोकल्या आहेत.

प्रतिक विजय साठे आणि बजरंग उर्फ बज्या सुरेश माने (रा. बुधवार पेठ, कराड), अशी अटक करण्यात आलेल्या तडीपार गुंडांची नावे आहेत. त्यांना सहा महिन्यांसाठी सातारा आणि सांगली जिल्ह्यातील शिराळा, वाळवा आणि कडेगाव तालुक्यातून हद्दपार करण्यात आले होते.

सहा महिन्यासाठी करण्यात आले होते तडीपार - प्रतिक विजय साठे आणि बजरंग उर्फ बज्या सुरेश माने (रा. बुधवार पेठ, कराड) यांना सातारा जिल्हा आणि सांगली जिल्ह्यातील शिराळा, वाळवा आणि कडेगाव तालुक्यातून सहा महिन्यांसाठी हद्दपार करण्याचा आदेश प्राधिकरणाने दि. 19 एप्रिल रोजी दिला होता. तरीही दोन्ही गुंड कराड बसस्थानक परिसरात खुलेआम फिरत होते. स्थानिक गुन्हे शाखेला याबाबतची माहिती मिळताच एलसीबीच्या पथकाने रात्री उशीरा त्यांना कराड बसस्थानक परिसरातून ताब्यात घेऊन कराड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद केला. पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल, अपर पोलीस अधीक्षक अजित बोऱ्हाडे यांच्या आदेशानुसार आणि पोलीस निरीक्षक किशोर धुमाळ यांच्या मार्गदरशाखाली हवालदार साबीर मुल्ला, मंगेश महाडीक, अमोल माने, मुनीर मुल्ला, मयुर देशमुख, मोहसिन मोमीन, प्रवीण पवार, केतन शिंदे, गणेश कचरे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# बनावट कागदपत्र बनवून 32 कोटी रुपयांची फसवणूक करणाऱ्या बिल्डरला अटक




मुंबई - बनावट कागद पत्र बनवून फसवणूक करणाऱ्या बिल्डरला आर्थिक गुन्हे शाखेच्या गृहनिर्माण युनिटने गुरुवारी अटक केली. बिल्डरविरोधात 32 कोटी रुपयांची फसवणूक प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. न्यायालयासमोर हजर केले असता त्यास पोलीस कोठडी देण्यात आली आहे. बनावट कागदपत्रे सादर करून आणि फ्लॅट खरेदीदारांची 32 कोटी रुपयांची फसवणूक करून पुनर्विकास प्रकल्पाचा भाग नसलेल्या भूखंडाचे बुकिंग स्वीकारल्याच्या आरोपाखाली मुंबईतील बिल्डरला आर्थिक गुन्हे शाखेच्या गृहनिर्माण युनिटने गुरुवारी अटक केली आहे. आरोपी सचिन खानोलकर (52) याच्यावर फसवणूक आणि बनावट कागदपत्रे तयार केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.आरोपी सचिन खानोलकर आणि मयुरेश औडेगावकर हे परळ-दादर परिसरात असलेल्या सिध्दिविनायक बांधकामांचे संचालक आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिध्दिविनायक फर्मवर चिंचपोकळी येथील दत्ताराम लाड मार्गावरील श्रीमतुओका हाऊसिंग सोसायटीचे पुनर्विकास आणि सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या पूर्णत: प्रमाणपत्र सीसी (CC) च्या मंजुरीपेक्षा जास्त बांधकाम केल्याचा आरोप आहे. या फर्मने डॉ. बोथेरे यांची 6.32 कोटी रुपयांची फसवणूक केली. शिवाय 51 इतर गुंतवणूकदारांकडून एकूण 32 कोटी रुपयांचे बुकिंग स्वीकारले. पोलीस अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फर्मने बेकायदेशीरपणे गृहनिर्माण संस्थेचे बांधकाम केले आहे.

# पोलिसांच्या कठोर निगराणीमुळे महाराष्ट्रात परिस्थिती नियंत्रणात : दिलीप वळसे पाटील

नागपूर : नूपुर शर्मा प्रकरणात पोलिसांनी नियोजनबद्ध योजना आखली. सर्व समाज घटकांशी चर्चा करून शांततेचे आवाहन करण्यात आले. सर्व घटकांनी यात चांगला प्रतिसाद दिल्यामुळे महाराष्ट्रात अद्याप कुठलीही दंगल घडली नाही, असे प्रतिपादन राज्याचे गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी रविवारी येथे केले. गृहमंत्री दिलीप वळसे पाटीलनागपूर दौऱ्यावर आले असताना पत्रकारांनी रविभवन येथे त्यांच्याशी संवाद साधला. ते म्हणाले, नूपुर शर्मा प्रकरणात महाराष्ट्रात अनुचित प्रकार घडू नये यासाठी पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडियाच्या हालचालीवर बारकाईने लक्ष देण्यात येत आहे. राज्यात आजपर्यंत जेथे-जेथे दंगली घडल्या तेथील असामाजिक तत्त्वांवर आम्ही लक्ष ठेवून आहोत. शक्ती कायदा



राष्ट्रपतींच्या मंजुरीसाठी पाठविण्यात आला होता; परंतु राष्ट्रपती कार्यालयाने या कायद्यात काही त्रुटी काढून हा कायदा परत पाठविला आहे. लवकरच यातील त्रुटी पूर्ण करून हा कायदा परत राष्ट्रपतींकडे पाठविण्याची कार्यवाही सुरू आहे. कन्हान येथे कराटे प्रशिक्षकाने बलात्कार केल्याच्या प्रकरणात जलदगती न्यायालयात खटला चालवून आरोपीला शिक्षा देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

नागपूर येथील मध्यवर्ती कारागृहात नेहमीच कैद्यांचा मृत्यू, मोबाइल सापडण्याच्या घटना घडतात, याकडे पत्रकारांनी लक्ष वेधले. त्यावर बोलताना गृहमंत्री म्हणाले, नागपूर कारागृह दुसरीकडे स्थलांतरित करण्याचा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा प्रस्ताव आहे. तुरुंगात होणाऱ्या गैरव्यवहारांबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांचे पथक पाठवून योग्य ती चौकशी करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

तंटामुक्ती अभियान पुनर्जीवित करणार तत्कालीन गृहमंत्री स्व. आर. आर. पाटील यांच्या कार्यकाळात सुरू असलेले तंटामुक्त गाव अभियान पुनर्जीवित करण्याचा प्रस्ताव आल्याची माहिती गृहमंत्र्यांनी दिली. ते म्हणाले, या योजनेचे अध्यक्ष मुख्यमंत्री असतात. त्यामुळे ही योजना पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी जोरकस प्रयत्न करण्यात येत आहेत. नक्षल्यांच्या बंदोबस्तासाठी छत्तीसगडनेही प्रयत्न करावेत नक्षलवाद्यांच्या ...पान २ वर...

# एक कोटी रुपयांचा विमा मिळवण्यासाठी पत्नीचा कट, पतीची हत्या करण्यासाठी दहा लाख रुपयांची सुपारी!



बीड : बीडमध्ये मसोबा फाट्याजवळ आढळलेल्या मृतदेहाची ओळख पटली हा खून असल्याचं पोलीस तपासात समोर आलं आहे. या खुनाचा उलगड झाला असून मृताच्या पत्नीनेच त्याला मारण्यासाठी दहा लाखांची सुपारी दिली होती. नवऱ्याचा एक कोटी रुपयांच्या विम्यासाठी त्याची हत्या करण्यासाठी पत्नीने सुपारी दिली होती. काही दिवसांपूर्वी बीड तालुक्यातील पिंपरगव्हाण शिवारात मसोबा फाट्याजवळ एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह पोलिसांना आढळून आला होता. त्यानंतर बीड ग्रामीण पोलिसांनी हा मृतदेह नेमका कोणाचा आणि या ...पान २ वर...

पोलीस बातमी पत्र

मुंबई



मुंबई, मंगळवार १४ ते २० जून - २०२२

# डोंबिवलीत धनप्राप्तीसाठी मुंगूस पाळणाऱ्या व्यावसायिकावर वनविभागाकडून कारवाई



मुंगुस हा शुभ प्राणी मानला जातो. तो दररोज दिसला तर दिवस चांगला जातो आणि धनप्राप्ती होते या अंधश्रद्धेतून डोंबिवलीतील एका व्यावसायिकाने चार मूंगुस आपल्या घराच्या दारातील पिंजऱ्यात डांबून ठेवले होते. त्यांचे तो संगोपन करत होता. याविषयी वन विभागाला माहिति मिळताच वन विभागाच्या भरारी पथकाने व्यावसायिकाच्या घरी छापा टाकला. चारही मूंगुस ताब्यात घेऊन व्यावसायिकावर कायदेशीर कारवाई केली. विठ्ठल जोशी अशी कारवाई झालेल्या व्यावसायिकाचे नाव आहे. ते जुनी डोंबिवलीतील शास्त्रीनगर भागात गणेश स्मृति इमारतीत राहतात. मुंगसाचा चेहरा दररोज सकाळी बघितला तर दिवस चांगला जातो, त्याच बरोबर धनप्राप्ती होते, अशी विठ्ठल जोशी यांची अंधश्रध्दा होती. या अंधश्रध्देमधून त्यांनी चार मूंगुस जंगलामधून पकडून आणले होते. हे चारही मुंगूस एक पिंजऱ्यात बंदिस्त करून ठेवण्यात आले होते. या मूंगसांची खाण्याची चांगली बडदास्त विठ्ठल यांनी ठेवली होती. मूंगुस हा जंगली वन्यजीव आहे. त्याला बंदिस्त करून मालक काय साध्य करत आहे, असे प्रश्न या भागातील रहिवासी करत होते. त्यांना त्यांच्या मोकळया वातावरणात सोडून द्यावे अशी रहिवाशांची मागणी होती. याविषयीची माहिती काही जागरूक रहिवाशांनी वन विभागाला दिली. वन विभागाच्या पथकाने खात्री केल्यानंतर विठ्ठल जोशी यांच्या घरी छापा टाकला. घराच्या दारात पिंजऱ्यात बंदिस्त करून ठेवलेले मूंगुस ताब्यात घेतले. विठ्ठल जोशी यांच्यावर कायदेशीवर कारवाई करण्यात आली आहे, असे वन अधिकाऱ्याने सांगितले. जंगली अधिवास हा वन्यजीवांचा मुख्य निवारा आहे. वन्यजीवांची मोठी साखळी एकमेकांवर अवलंबून असते.

# शहर अभियंता विभागाची निष्क्रियता, टिटवाळा-बल्याणी-आंबिवली रस्त्याची दुरवस्था



कल्याण- नवीन कल्याणचा एक महत्वपूर्ण भाग असलेल्या आंबिवली, बल्याणी, मोहने आणि टिटवाळा परिसरातील अनेक रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. रहिवाशांना खड्डे, चऱ्या, तुटलेल्या कडांच्या रस्त्यांवरून येजा करावी लागते. वर्षभर त्रास सहन करून कल्याण डोंबिवली पालिका प्रशासन या वर्दळीच्या रस्त्याची देखभाल करत नसल्याने या भागातील रहिवासी, माजी नगरसेवक तीव्र नाराजी व्यक्त करत आहेत. रिक्षा चालक, रहिवाशांनी पालिकेने मुसळधार पाऊस सुरू होण्यापूर्वी या रस्त्याची डागडुजी केली नाहीतर शहर अभियंता सपना कोळी-देवनपल्ली यांच्या कार्यालयावर मोर्चा काढण्याचा निर्धार केला आहे. दीड वर्षापासून आंबिवली, बल्याणी भागातील नगरसेवक, रहिवासी पालिकेच्या शहर अभियंता विभाग, बांधकाम विभागाकडे दुरवस्था झालेल्या बल्याणी रस्त्याची दुरुस्ती करा म्हणून तगादा लावून आहेत. या महत्वपूर्ण रस्त्याकडे शहर अभियंता सपना कोळी यांनी वर्षभरात लक्ष न दिल्याने बल्याणी रस्त्याचा विषय रेंगाळला, असे या भागातील रहिवाशांनी सांगितले. प्रभागातील अभियंत्यांनी नादुरुस्त झालेल्या रस्ते कामाचे प्रस्ताव शहर अभियंता विभागाकडे पाठविले की ते तात्काळ मंजूर करण्याऐवजी लालफितीत ठेवण्याचे काम सुरू असल्याची माहिती अभियंत्यांच्या चर्चेतून समजते. अनेक वेळा निधीचे कारण सांगून शहर अभियंता विभाग नस्ती मंजुरीची प्रक्रिया करत नसल्याचे अभियते सांगतात. आंबिवली-टिटवाळा भागातील हजारो रहिवासी दररोज कल्याण रेल्वे स्थानकात उतरून रिक्षा, खासगी वाहनाने आंबिवली, टिटवाळा, मोहने, बल्याणी परिसरात प्रवास करतात. बल्याणी येथील खराब रस्त्यामुळे अनेक वेळा रिक्षा चालक या रस्त्यावरून प्रवासी भाडे घेऊन येण्यास तयार होत नाहीत. शहर अभियंता विभागाकडून बल्याणी रस्त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने या भागातील एक जागरूक रहिवासी प्रवीण आंबरे यांनी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्याकडे यासंदर्भात तक्रार केली आहे. शहर अभियंता कोळी यांच्या संथगती कामामुळे आम्हाला लोकांच्या रोषाला तोंड द्यावे लागते, असे अभियंत्यांचे खासगीत म्हणणे आहे. नगरसेवकांची राजवट पालिकेत नसल्याने त्याचा गैरफायदा शहर अभियंता विभाग घेत आहे, असे माजी नगरसेवकांनी सांगितले. पालिकेत सत्ता स्थापन झाली की गेल्या तीन वर्षात शहर अभियंता विभागाने विकास आराखड्यातील किती रस्ते बांधले, नवीन रस्त्यांची बांधणी केली याविषयी आम्ही जाब विचारणार आहोत, असे ज्येष्ठ नगरसेवकाने सांगितले. टिटवाळा-बल्याणी-आंबिवली रस्त्यासाठी नऊ ते १० कोटीचा निधी अपेक्षित आहे. पालिकेकडे निधी नसल्याने या रस्त्यावरील वैष्णोदेवी मंदिर ते आंबेडकर चौक या अर्ध्या रस्त्याचे काम हाती घेण्याचे प्रशासनाने निश्चित केले आहे. हा अर्धवट रस्ता करून प्रशासन काय साध्य करणार आहे. या भागातील विकासकांकडून पालिकेने कोट्यवधी रुपयांचा विकास अधिभार वसूल केला आहे. तो पैसा कुठे गेला. तो पण करोनाच्या नावाने उधळला का, अशा संतप्त प्रतिक्रिया रहिवाशांकडून दिल्या जात आहेत. शहर अभियंता सपना कोळी रजेवर असल्याने त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही. शहर अभियंता विभागाचा प्रभारी पदभार तरूण जुनेजा या प्रामाणिक, कर्तव्यात कठोर असलेल्या कार्यकारी अभियंत्याकडे आल्याने त्यांनी यापूर्वीच्या शहर अभियंता विभागात साचलेल्या सर्व नस्ती मार्गी लावण्याचा सपाटा लावला आहे. यामुळे अभियंता, ठेकेदारांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. बल्याणी रस्त्यावरील वैष्मोदेवी मंदिर-आंबेडकर चौक रस्त्याची निविदा प्रक्रिया करण्यात आली आहे. या कामासाठी नऊ कोटी निधी प्रस्तावित आहे. - जगदीश कोरे, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग

# नवीन सोन्याच्या पेढीत दागिने लावण्यासाठी नेले, पुन्हा परत केलेच नाहीत, डोंबिवलीतील सराफाची ३५ लाखाची फसवणूक

आपण कल्याण येथे नवीन सोन्याची पेढी सुरू करत आहोत. दुकानात लावण्यासाठी सोन्याचे दागिने द्या. उद्घाटन झाले की ते दागिने दुसऱ्या दिवशी आणून देतो, असे खोटे सांगून कल्याणमधील वायलेनगर मधील दोन जणांनी डोंबिवलीतील फडके रस्त्यावरील एका सराफाची ३५ लाख रूपयांची फसवणूक केली आहे. दागिने नाहीच, पण त्याच्या बाजारमूल्याचे पैसेही दोघांनी परत न केल्याने फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर सराफाने रामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. धनसुख पोपटलाल जैन (४०) यांचा डोंबिवली पूर्वेतील फडके रस्त्यावर चिराग इमारतीत मॉडर्न हॉटेलच्या वरती दुसऱ्या माळयावर सोन्याचे दागिने खरेदी विक्रीचा व्यवसाय आहे. धनसुख जैन यांच्या व्यवसायाची माहिती काढून कल्याणमधील वायलेनगर भागातील विश्वनाथ बाबुराव जगताप व त्याचा मामेभाऊ सागर अर्जुन साळुंखे हे धनसुख यांच्या डोंबिवलीतील दुकानात त्यांची फसवणूक करण्याच्या विचाराने आले. त्यांनी धनसुख यांना आम्ही




सोन्याचे नवीन दुकान सुरू करत आहोत. सुरूवातीला दुकानात ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणात दागिने नाहीत. तेव्हा दुकानाचे उद्घाटन होण्याच्या दिवसापुरते आपणास सोन्याचे दागिने देण्यात यावेत. यामधील काही दागिने आम्ही आकर्षक किमतीला विकतही घेणार आहोत, असे खोटे आमिष धनसुख यांना दाखविले. दागिन्यांना चांगले गिऱ्हाईक मिळाले आहे. असा विचार करून विश्वनाथ, सागर यांच्या बोलण्यावर विश्वास ठेऊन धनसुख यांनी दुकानातील ६७८ ग्रॅम वजनाचे ३५ लाख ४१ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने विश्वनाथ, सागर यांच्या ताब्यात दिले. उद्घाटन झाल्यानंतर दोघेही दागिने परत घेऊन येत नाहीत म्हणून धनसुख यांनी त्यांना संपर्क केला. ते सुरूवातीला दागिने घेऊन येतो असे सांगू लागले. विविध कारणे देऊन ते धनसुख यांना टाळू लागले. महिना उलटून गेला तरी विश्वनाथ, सागर आपले दागिने परत करत नाहीत. दागिने विकत घेण्याची भाषा करत नाहीत. त्यामुळे ते आपली फसवणूक करत आहेत. या दोघांनी नवीन दुकाने वगैरे सुरू केले नसल्याची माहिती सराफाला मिळाली. त्यामुळे आपली फसवणूक आणि आपल्या पैशाचा अपहार विश्वनाथ जगताप, सागर साळुंखे यांनी केला आहे. याची जाणीव झाल्याने धनसुख जैन यांनी रामनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. साहाय्यक पोलीस निरीक्षक वाय. पी. सानप तपास अधिकारी आहेत.


## मिरा भाईंदर महानगरपालिका

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग

तळ मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,

जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७, दुरध्वनी क्र. २८१०३४०९

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/वृ.प्रा./मिरारोड/ /२०२२-२३ दिनांक : /०६/२०२२

// जाहिर नोटिस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, खालील नमुद तक्त्यातील झाड काढणे करणेकामी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्याचा तपशिलखालीलप्रमाणे.

| अ.क्र | ठिकाण | वृक्षाचे नाव | संख्या | झाडे काढणे /पुर्न:रोपन करणे | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १ | इडन रोझ ७-ए को.ऑ.हौ.सो.लि,बेवरली पार्क मिरारोड (पु.) | पाम | ०१ | पुर्न:रोपन करणे | धोकादायक |
| २ | श्री सिद्धी विनायक इंडस्ट्रीज,प्लॉट नं-१९, काशिमिरा इंडस्ट्रीज इस्टेड | पिंपळ | ०१ | मुळासहित काढणे | |
| | | जंगली चेरी | ०१ | मुळासहित काढणे | |
| ३ | आरक्षण क्र.३००,बेवरली पार्क, मिरारोड (पु.) (स्वर्गिय प्रमोद महाजन कलादालन बांधणे कामात बाधित) | फॉक्सस्टेल पाम | १७ | पुर्न:रोपन करणे | विकासकामात बाधित |
| | | सुभाबुळ | ०१ | मुळासहित काढणे | |
| | | सप्तपर्णी | ०१ | मुळासहित काढणे | |
| | | बदाम | ०२ | मुळासहित काढणे | |
| | | गुलमोहर | ०२ | मुळासहित काढणे | |
| | | कपाशी | ०१ | मुळासहित काढणे | |
| ४ | धनलक्ष्मी को.ऑ.हौ.सो.लि. लक्ष्मी पार्क-२ ,विजय पार्क,मिरारोड (पु) | जांभूळ | ०१ | मुळासहित काढणे | धोकादायक |

सदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याची /स्थलांतरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरिंकाच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (वृक्ष प्राधिकरण), उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे किंवा garden@mbmc.gov.in किंवा mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. सबब विस्तृत माहिती महापालिका संकेत स्थळावर उपलब्ध आहे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

जा.क्र मनपा/जनसंपर्क/९५/२०२२-२३
दिनांक १०/०६/२०२२

सही/-
(योगेश गुणिजन)
सहाय्यक आयुक्त तथा
वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका


# उल्हासनगरात गावगुंडांचा उच्छाद; खाद्यपदार्थ विक्रेत्याला बेदम मारहाण करत हत्येचा प्रयत्न




चायनीज खाद्यपदार्थ देण्यास उशीर केल्याने उल्हासनगरच्या कॅम्प चार भागात काही तरूणांनी चायनीज विक्रेता आणि त्याच्या नातेवाईकाला बेदम मारहाण केली आहे. आरोपींनी विक्रेत्याच्या पोटावर चाकूने वार केले असून त्यांच्या नातेवाईकाचे दोन्ही हात मोडले आहेत. याप्रकरणी उल्हासनगरच्या विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात हत्येचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उल्हासनगर कॅम्प चार येथील व्हिनस चौकात असलेल्या चायनीज खाद्यपदार्थाच्या दुकानात रविवारी रात्री सुशील भोईर याने जेवण पार्सल देण्याची ऑर्डर दिली होती. मात्र हॉटेल बंद झाल्याने पार्सल देण्यास उशीर झाला. त्यामुळे सुशील भोईर याने ज्ञानेश्वर भोईर याला दुकानात पाठवले. यावेळी फिर्यादी दुकानदार दर्शन संतलाल राय आणि ज्ञानेश्वर भोईर यांच्यात वाद झाला. वादाचे रुपांतर हाणामारीत होऊन ज्ञानेश्वर भोईर याला दर्शन राय यांनी मारहाण केली. त्याचा राग आल्याने ज्ञानेश्वर भोईर याने त्याच्या इतर साथीदारांना पाचारण केलं. त्यावेळी सुशील भोईर, शैलेश भोईर, अशोक कोळी आणि त्याचे पाच ते सहा सहकाऱ्यांनी दर्शन राय यांच्या डोक्यावर लोखंडी सळई, काचेच्या बाटलीने हल्ला केला. तसेच एका आरोपीनं त्याच्याजवळ असलेल्या चाकुने दर्शन राय यांच्या पोटावर वार करत जीवे मारण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, दर्शन राय यांचे जावई, मुलगा आणि इतर कर्मचारी भांडण सोडवण्यासाठी पुढे सरसावले. मात्र हल्लेखोरांपैकी एकाने दर्शन राय यांच्या जावयावरही काचेच्या बाटलीने हल्ला केला. तसेच दोन्ही हातांवर, डाव्या पायावर गंभीर मारहाण केली. यात राय यांच्या जावयाचे दोन्ही हात मोडले आहेत. याप्रकरणी विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकाराने उल्हासनगरात एकच खळबळ उडाली आहे.

पृष्ठ १ वरुन

## पार्सल द्यायला उशीर झाल्याने

पार्सल न मिळाल्यानं त्यानं दर्शन राय यांना शिवीगाळ करत मारहाण केली. यावेळी दुकानातील कारागिरांनी त्याला प्रत्युत्तर देत हुसकावून लावलं. काही वेळाने ज्ञानेश्वर भोईर हा त्याच्यासोबत कुख्यात गुंड शैलेश भोईर याच्यासह सुशील भोईर, अशोक कोळी आणि अन्य ४-५ जणांना घेऊन आला आणि त्यांनी थेट दर्शन राय यांच्यावर हल्ला चढवला. त्यांच्या डोक्यात बिअरची बाटली फोडत, रॉडने मारहाण करण्यात आली. तसंच त्यांच्या पोटात चाकू खुपसण्यात आला. यावेळी त्यांना वाचवण्यासाठी आलेला त्यांचा जावई रुपेश राय याच्याही डोक्यात बिअरची बाटली फोडून सिलिंडर आणि रॉडने मारहाण करण्यात आली. या घटनेत रुपेश याच्या डोक्यात दुखापत होऊन त्याचे दोन्ही हात फ्रॅक्चर झाले. हाणामारीची ही घटना दुकानातल्या सीसीटीव्ही कॅमेरातही कैद झाली. या घटनेनंतर कारागिरांनी या दोघांना उचलून जवळच्या खासगी रुग्णालयात दाखल केलं. तर या घटनेप्रकरणी विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करून तीन जणांना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. या तिघांनाही सध्या पोलीस कोठडी सुनावण्यात आली असून त्यांच्या उर्वरित साथीदारांचा शोध सुरू असल्याची माहिती विठ्ठलवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय गायकवाड यांनी दिली आहे. दरम्यान, व्हीनस चौक हा उल्हासनगर शहरातला अतिशय गजबजलेला चौक म्हणून ओळखला जातो. या परिसरात घडलेल्या या घटनेमुळे व्यापारी वर्गात दहशत पसरली असून पोलिसांसमोर कायदा सुव्यवस्था कायम राखण्याचं आव्हान निर्माण झालंय.

## बंद घर हेरून टाकायच्या डल्ला

महिला कैद झाल्या होत्या. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी या तिन्ही महिलांचा शोध सुरू केला. कल्याण क्राईम ब्रांचने डोंबिवली स्टेशन परिसरातील सीसीटीव्ही तपासले असता त्यांना या महिला स्टेशनहून ट्रेनने मुंबईच्या दिशेने गेल्याचे दिसून आले. पुढे पोलिसांनी प्रत्येक रेल्वे स्थानकावरील सीसीटिव्ही तपासले असता घाटकोपर येथे महिला उतरल्याचे सीसीटीव्हीमध्ये दिसून आलं. या तिन्ही महिला मानखुर्द आणि कुर्ला परिसरातील असल्याची माहिती खबऱ्यामार्फत पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी या तिन्ही महिलांचा शोध सुरू केला. तपासादरम्यान पोलिसांना या तिन्ही महिला सहकुटुंब जेजुरीला देवदर्शनासाठी गेल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे कल्याण गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक किशोर शिरसाठ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मोहन कळमकर, पोलीस नाईक विनोद चनने, पोलीस कर्मचारी अनुप कामत यांच्या पथकाने तत्काळ जेजुरी येथे सापळा रचत या तिन्ही महिलांना अटक केली आहे. पोलिसांनी महिलांकडून चोरीचे 23 तोळे सोन्याचे दागिने जप्त केले आहेत. या तिघी कधी पासून चोऱ्या करत आहेत आणि अजून किती ठिकाणी अशा प्रकारच्या चोऱ्या केल्या आहेत, याचा तपास पोलीस करत आहेत. दरम्यान, या आधी त्यांच्या विरोधात मुंबई-ठाणे परिसरातील पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल असल्याची माहिती कल्याण क्राइम ब्रांचचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक किशोर शिरसाठ यांनी दिली.

## पोलिसांच्या कठोर निगराणीमुळे

प्रश्नावर बोलताना गृहमंत्री म्हणाले, महाराष्ट्रात पोलिसांच्या कारवाईमुळे नक्षलवादी चळवळीवर मोठा परिणाम झाला आहे. महाराष्ट्र पोलिसांनी कठोर कारवाई करून नक्षलवाद्यांना छत्तीसगडच्या सीमेपर्यंत हुसकावून लावले आहे. आता छत्तीसगड पोलिसांनीही नक्षलवाद्यांचा बंदोबस्त करण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

## पुणे पोलिसांना मोटं यश

आणि यामधील एक शार्पशूटर हा राजस्थानमधील होता.संतोष जाधवच्या अटकेमुळे मुसेवाला प्रकरणाचा उलगडा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.संतोष जाधव कोण आहे?

* संतोष जाधव हा २३ वर्षांचा आहे. तो मूळचा आंबेगाव तालुक्याच्या आदिवासी भागातील पोखरी गावचा आहे. त्याचं मंचरमध्ये वास्तव्य होतं.

*त्याच्या कुटुंबात आई, बहीण, पत्नी आणि एक मुलगी आहे.

*मंचर पोलीस स्टेशन हद्दीत राण्या उर्फ ओमकार बानखीले यांचा १ ऑगस्ट २०२१ रोजी खून करण्यात आला होता. संतोष जाधव या खुनात सहभागी असल्याचा गुन्हा दाखल आहे.

*त्याशिवाय, मंचर पोलीस त्याच्यावर ठाण्यात एक खंडणीचा, चोरीचा गुन्हा देखील दाखल आहे.

*राण्या बानखीले खुनाच्या गुन्ह्यात त्याच्यावर मोक्का देखील लावण्यात आला असून तो फरार आहे. या प्रकरणात त्याला तडीपार करण्यात आले होते. *त्यानंतर त्याचे राजस्थान, पंजाब, हरियाणा या भागात वास्तव्य होते. येथेही त्याच्यावर अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत.

## एक कोटी रुपयांचा विमा मिळवण्यासाठी

व्यक्तीचा मृत्यू कशामुळे झाला याचा शोध घेण्यास सुरुवात केली. पोलिसांच्या प्राथमिक तपासामध्ये या व्यक्तीचा मृत्यू अपघातामध्ये झाला असल्याचा संशय पोलिसांना होता. चौकशी केल्यानंतर बीड शहरातील मंचक गोविंद पवार या व्यक्तीचा मृतदेह असल्याचे पोलिसांना समजलं. या प्रकरणी मंचक यांचा मुलगा आणि पत्नी यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी पोलिसांना सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे पोलिसांचा त्यांच्यावरील संशय अधिक बळावला. मंचक यांचा अपघात नसून त्यांचा घातपात केल्याचं पोलिसांना वाटू लागलं आणि सबळ पुरावे नसतानाही पोलिसांनी मंचक पवार यांच्या मृत्यूचे गूढ उलगडायला सुरुवात केली. पोलिसांचं गोपनीय पथक याबद्दल माहिती घेत असतानाच त्यांनी बीड तालुक्यातीलच काकडीचा इथल्या श्रीकृष्ण सखाराम बागलाने याला ताब्यात घेतलं.

श्रीकृष्ण बागलाने याच्याकडे पोलिसांनी विचारणा केली असता सुरुवातीला त्यानेही पोलिसांना हुलकावणी देण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसी खाक्या दाखवताच तो पोपटासारखा बोलू लागला. मृत मंचर पवार यांची पत्नी गंगाबाई पवार हिने आपल्या पतीला मारण्यासाठी दहा लाख रुपयांची सुपारी माझ्यासह इतर तीन जणांना दिली होती, अशी कबुली त्याने पोलिसांना दिली. त्यानंतर पोलिसांनी श्रीकृष्ण बागलाने याच्यासह सोमेश्वर वैजनाथ गव्हाणे, गंगाबाई मंचक पवार यांना बेड्या ठोकल्या आहेत तर दोन अन्य आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत.

असा केला खून!

मृत मंचक पवार यांच्या नावाने एक कोटी रुपयांची विमा पॉलिसी होती. ती आपल्याला मिळावी म्हणून गंगाबाई पवार हिने पती मंचक यांची श्रीकृष्ण बागलाने याला दहा लाख रुपयाला सुपारी दिली. ठरल्याप्रमाणे श्रीकृष्ण बागलाने याने मंचक पवार याला दिवसभर आपल्यासोबत दारु पाजली. त्यानंतर शहरातीलच एका अज्ञात रस्त्यावर त्याच्या डोक्यात वार करुन खून केला. त्यानंतर त्याला एका स्कूटरवर बसवून मसोबा फाट्याजवळ एका टेम्पोने त्याला धडक दिली. धडकेत मंचक पवार यांचा मृत्यू झाल्याचं भासवलं आणि घटनास्थळाहून श्रीकृष्ण बागलानेसह त्याचे दोन साथीदार पसार झाले.

# पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार १४ ते २० जून - २०२२


संपादकीय...



## सरकारी शाळांचे 'मोल'..

'करोनाच्या साथीनंतर शिक्षण पार बदलेल' यासारखे उत्साही दावे पोकळ ठरल्याचा आनंद जूनमध्ये 'नेहमीप्रमाणे' भरणाऱ्या शाळा देत आहेत, पण शालेय शिक्षणात सारेच पहिल्यासारखे उरलेले नाही. महासाथीच्या आर्थिक तडाख्यातून सावरताना दमछाक झालेल्या अनेक कुटुंबांतील बालके या काळात शाळेपासून दुरावली होती, त्याच वेळी गेली काही वर्षे उतरती कळा लागलेल्या शासकीय शाळांमधील पटसंख्या यंदा काहीशी वाढू लागली आहे. खासगी शाळांतील पाल्यांना शासकीय शाळांच्या वर्गात नेऊन बसवण्याकडे पालकांचा कल वाढला आहे. देशभरातील शासकीय शाळांचा पट जवळपास ४० लाखांनी वाढल्याचे आकडेवारीवरून दिसते आहे. सवा शुल्क हे शाळांबाबतचा कल बदलण्यामागील एक कारण. एकीकडे लाखो रुपयांचे शुल्क घेणाऱ्या खासगी शाळा किंवा मोफत वा तुलनेत अत्यल्प म्हणावे असे शुल्क असलेल्या शासकीय शाळा अशा पर्यायांपैकी शासकीय शाळांचा पर्याय जवळचा वाटणे साहजिक होते. शहरांमधून गावांकडे झालेले स्थलांतर हे दुसरे कारण. चकचकीत इमारती, आकर्षक गणवेश, इंग्रजीचे आकर्षण याकडे असलेला पालकांचा ओढा सरला असेही ठोसपणे म्हणता येणार नाही. मात्र, शिक्षण ही प्रक्रिया या देखाव्यापलीकडील आहे याची जाणीव होऊ लागली आहे. ती जाणीव टिकवणे हे खरे आव्हान आहे. अजूनही अपवाद वगळता बहुतांशी शासकीय शाळा पायाभूत सुविधांबाबत



राज्यातही मुंबई महापालिकेसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील विद्यार्थिसंख्या वाढते आहे. करोनाकाळात वेगवेगळ्या शैक्षणिक दशावतारांसह सरलेल्या शैक्षणिक वर्षांनंतर शासकीय शाळांबाबत वाटू लागलेली आपुलकी काहीशी दिलासादायक म्हणावी अशीच. मात्र दोन वर्षांत शासकीय शाळांचा दर्जा अचानक उंचावला असे म्हणणे अंमळ धारिष्ट्याचेच ठरावे. करोनाच्या साथीमुळे शाळा बंद झाल्यानंतर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान भरून काढण्यासाठी शिक्षकांनी अनेक प्रयत्न केले. शासकीय शाळांतील शिक्षक खेडोपाडी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचून त्यांना शिक्षण प्रवाहात कायम ठेवण्यासाठी काम करत होते. तसेच खासगी शाळांतील शिक्षकही प्रयत्नशील होते. मुळातच शासकीय शाळांच्या तुलनेत काहीशा अधिक तंत्रस्नेही असलेल्या खासगी शाळा सोडून पालकांनी शासकीय शाळांना जवळ केले, याचे कारण या अनेक कुटुंबांच्या बदललेल्या आर्थिक गणितात आहे. खासगी शाळांचे अवाच्या मागे आहेत. स्वच्छतागृहे आहेत पण तेथे दारे नाहीत. पिण्याच्या पाण्याची टाकी आहे पण पाणी नाही, संगणक आहेत पण वीज नाही.. अशी स्थिती यापैकी अनेक शाळांमध्ये आहे. वास्तविक दोन वर्षे शाळा बंद असताना या सुविधा उभ्या करण्यासाठी हाती अवधी होता. मात्र, मुळातच विद्यार्थ्यांना गाठायचे कसे आणि शिकवायचे कसे, या बाबतीत गोंधळलेल्या शिक्षण विभागाने पायाभूत सुविधांकडे फारसे लक्ष दिले नाही. अनेक शाळांमध्ये असलेल्या सुविधांची दुरवस्था या दोन वर्षांत झाली. या सुविधांसाठी लोकसहभाग वा कंपन्यांनी सामाजिक उत्तरदायित्व म्हणून दिलेला निधीही साथीमुळे आटला. मात्र, आता शिक्षणाचे मोल कळले म्हणून असो किंवा अपरिहार्यता म्हणून असो शासकीय शाळांचा वाढता पट टिकवण्यासाठी शिक्षण विभागाने वेळीच पावले उचलणे आवश्यक आहे. नाही तर आता या शाळांकडे वळलेली पालकांची पावले पुन्हा मागे फिरण्यास वेळ लागणार नाही.

# काय काय नाकारणार?



भारताला तळाचा क्रमांक देणारा पर्यावरण अहवाल आपण फेटाळून लावू, पण प्रश्न जमिनीवरील वास्तवाचाही आहे.. पर्यावरण मूल्यांकन निर्देशांकात भारतास 'तळा-गाळात' पाठवणारा पाहणी अहवाल आपणास मान्य नाही, हे नैसर्गिक म्हणायचे. जगाने आपले फक्त गुणगान करावे, आमच्यात दोष नाहीतच, असले तर आमचे आम्ही पाहून घेऊ ही आपली आंतरराष्ट्रीय राजनीती. तेव्हा हा अहवाल नाकारणे ओघाने आलेच. या पाहणीत हवेची शुद्धता, वायुप्रदूषण, पाणी व त्याचा दर्जा, स्वच्छता, जैवविविधता जतन, जलस्रोतांचे नियमन, कचऱ्याचे व्यवस्थापन, अपारंपरिक ऊर्जा, जलवायू परिवर्तन, कार्बन उत्सर्जन या साऱ्या महत्त्वाच्या मानकांमध्ये भारताची कामगिरी अतिशय सुमार दर्जाची आढळली. पर्यावरण स्वास्थ्य, परिसंस्थात्मक स्थिरता व हवामान बदल हे या अहवालातले तीन महत्त्वाचे घटक. यापैकी पहिल्या व दुसऱ्यात आपण १७८ व्या स्थानावर. आपल्याखाली कोण? तर पाकिस्तान व मार्शल आणि सॉलोमन बेटे हे देश. अनेकदा आपल्यापेक्षा खालच्या क्रमांकावर कोण यावर आपण समाधानाचे मोजमाप ठरवत असतो. इथे तर तीही सोय उरली नाही. तिसऱ्या घटकात भारत १६५ व्या स्थानावर. या अहवालातली उत्तम कामगिरी म्हणाल तर हीच. बाकी सर्व ठिकाणी तळाचा म्हणजे १८० वा क्रमांक कायम. दर दोन वर्षांनी प्रसिद्ध होणाऱ्या या अहवालात निर्देशांक निश्चितीसाठी या वेळी प्रथमच चाळीस मानकांचा वापर झाला. या कसोटीवर उतरले ते डेन्मार्क, फिनलँड व ब्रिटन. पर्यावरण रक्षणाच्या मुद्द्यावर सातत्याने नवनवे प्रयोग करणाऱ्या डेन्मार्कने विकसित केलेले तंत्रज्ञान साऱ्या जगाला मोफत देण्याची तयारी आधीच दर्शवली. त्यानुसार कार्बन उत्सर्जनात आघाडीवर असलेल्या, भारतासह १९ देशांनी डेन्मार्कशी करारही केला आहे. तरीही या देशांची कामगिरी सुधारलेली नाही. कारण नुसते करार करून काही होत नाही. अंमलबजावणीच्या पातळीवरसुद्धा झटावे लागते. या अहवालानुसार जगातले ४३ देश असे आहेत ज्यांची सर्व मानकांमधील कामगिरी इतकी असमाधानकारक की २०५० पर्यंत हे त्या देशांतील पर्यावरणीय चित्र बदलण्याची शक्यता नाही. यातही भारत आहे. ज्या देशांची धोरणे पारदर्शी आणि उद्योगस्नेही अशांची प्रगती योग्य दिशेने असल्याचे सांगतानाच हा अहवाल दरडोई उत्पन्न व पर्यावरणीय मानकांचा सहसंबंध कोणत्या देशात उत्कृष्ट हेही कथन करतो. पॅरिस करारातून बाहेर पडणाऱ्या अमेरिकेचा अपवाद वगळला तर जगभरातील अनेक श्रीमंत देशांनी या मुद्द्यावर चांगली कामगिरी बजावली, असे दाखवून देतानाच हा अहवाल इतर देशांविषयी तीव्र चिंता व्यक्त करतो. जगातल्या ५० टक्के देशांत रोज निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे व्यवस्थापन नीट केले जात नाही. त्याच्या विल्हेवाटीसाठी अनेक देशांनी नवनवे तंत्रज्ञान विकसित केले असले तरी या देशांनी ते स्वीकारण्यात फारशी उत्सुकता दाखवली नाही. त्यामुळे स्वच्छतेच्या मानकामध्ये हे देश खूपच मागे आहेत असे हा अहवाल सोदाहरण दाखवून देतो. आता प्रश्न उरतो तो गचाळ कामगिरी बजावणाऱ्या भारताचे काय? पर्यावरण रक्षणाच्या मुद्द्यावर केवळ हाकारे देण्यातच हा देश आजवर धन्यता मानत आलेला असे खेदाने का होईना पण नमूद करावे लागते. साधा ऊर्जेचा मुद्दा घ्या. अजूनही आपण पारंपरिक निर्मितीतच रमलो आहोत. एवढा महाकाय देश जादूची कांडी फिरवल्याप्रमाणे अपारंपरिक ऊर्जेकडे वळणे शक्य नाही. हे काम टप्प्याटप्प्यानेच होणे गरजेचे हे मान्य केले तरी यातली आपली प्रगती मुंगीच्या गतीचीच. सर्वाधिक प्रदूषण करणारे औष्णिक वीजनिर्मितीतील २००३ पूर्वीचे संच काढून टाकण्याचा निर्णय होऊन दीड दशक लोटले. अजूनही आणीबाणीच्या क्षणी हे संच चालवले जातातच. नव्याने लागलेल्या संचांनी २०१६ च्या प्रदूषणविषयक मानकांचे पालन करावे असे निर्देश अनेकदा दिले गेले, पण तेही पाळले जात नाहीत. ऊर्जासंकट उद्भवले की ही मानके आणखी विस्मरणात जातात. ऊर्जेसाठी लागणारा कोळसा व इतर खनिज उत्खननासाठी गेल्या वीस वर्षांत देशात आठ लाख हेक्टर जंगल नष्ट करण्यात आले. दिवंगत पर्यावरणमंत्री अनिल दवे यांनीच संसदेत दिलेली ही माहिती. अजूनही याच कारणांसाठी जंगल नष्ट करण्याचे उद्योग सुरूच आहेत. झाडे तोडू नका असे म्हणत आंदोलन करणाऱ्या आदिवासींना मागास व उद्योगविरोधी ठरवण्याच्या आपल्या वृत्तीत दिवसेंदिवस वाढच होत चाललेली. खरे तर हेच मागासपणाचे द्योतक. प्रदूषण करणारे उद्योग नको म्हणून आंदोलन करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना देशद्रोही ठरवणे, त्यांच्यावर परदेशी हस्तक असल्याचा ठपका ठेवणे, अशा आंदोलनांना ख्रिस्ती धर्मसंस्थेचे पाठबळ असल्याचा आरोप करून त्यांना हिंदूविरोधी म्हणून हिणवणे यातच राज्यकर्त्यांची ऊर्जा खर्च होताना दिसणे हे क्लेशदायकच. याच अहवालात परिसंस्थांची सुदृढता या मानकात भारताचा क्रमांक १७८ वा आहे. उद्योग विस्तारायचे ध्येय गाठण्याच्या नादात आपण जंगल, नद्यांचे मोठे नुकसान आजवर करत आलो आहोत. २०११ मध्ये 'वॉटरएड' या संस्थेने जगभरातील देशांचा पाणी गुणवत्ता सूचकांक प्रसिद्ध केला. यातील १२२ देशांच्या यादीत भारत १२० व्या क्रमांकावर होता. देशातील सर्व प्रमुख नद्या उद्योगांमुळे प्रदूषित झाल्यात असे सांगणाऱ्या या अहवालात गंगेचे उदाहरण ठळकपणे नमूद आहे. आज ११ वर्षांनंतर या स्थितीत तसूभरही फरक पडलेला नाही. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने २०१६ मध्ये समग्र पर्यावरणीय प्रदूषण सूचकांक प्रसिद्ध केला. त्यात देशातील १७ राज्यांतील ४३ औद्योगिक क्षेत्रे सर्वाधिक प्रदूषण पसरवणारी आहेत असे म्हटले होते. याचे पुढे काय झाले? मुळात असे काही अहवाल आले की घटकाभर चिंता व्यक्त करायची व नंतर मागील पानाहून पुढे करत चालायचे हीच धोरणकर्त्यांची वृत्ती राहिली. वाळूचा बेसुमार उपसा एकूणच परिसंस्थेची सुदृढता वेगाने नष्ट करतो. आज हे वेगाने सुरू आहे. त्यात सर्वपक्षीय आहेत. त्यामुळे अनेक नद्यांच्या पात्रात नुसती मातीच शिल्लक दिसते. हे चित्र असेच राहिले तर भविष्यात पर्यावरणप्रेमींना 'वाळू शोधयात्रा' काढाव्या लागतील. दुसरीकडे या उद्योगांतून रग्गड पैसा करणारे राजकारणीच पर्यावरणाचे महत्त्व समजावून सांगताना आपल्याला दिसतात. अनेक देशांनी कृत्रिम वाळू, फ्लाय अॅश असे पर्याय शोधले. भारत यातही मागेच. शेतजमिनींवर नत्रांचा, कीटकनाशकांचा मारा, पाणथळांच्या जागांवर कब्जा, समुद्रातून मासे काढण्यासाठी वापरले जाणारे अनैसर्गिक तंत्र, जैवविविधतेचे रक्षण करताना होणारा मर्यादित विचार, देशभरातील संरक्षित क्षेत्रात वेगाने होणारी घट या साऱ्या गोष्टी पर्यावरणाचे आरोग्य बिघडवणाऱ्या आहेत. याकडे कुणीही गांभीर्याने बघायला तयार नाही. पर्यावरण रक्षणाची जबाबदारी असलेल्या सरकारी संस्था राज्यकर्त्यांच्या बटीक झालेल्या. तर राज्यकर्ते पर्यावरण रक्षणाचे कायदे शिथिल करण्यात गुंतलेले. एकूणच हा सारा कारभार रामभरोसे. त्याचेच प्रतिबिंब या अहवालात उमटलेले दिसते. याच अहवालात पर्यावरणाच्या मुद्द्यावर भारताचा सामाजिक व मानवी निर्देशांक अतिशय कमी असून दखलपात्रदेखील नाही तो याच धोरणशून्यतेमुळे. या बेबंदशाहीचा फटका तापमानवाढ, अनियंत्रित पाऊस व नैसर्गिक संकटाच्या रूपाने सातत्याने आपल्याला सहन करावा लागतो आहे. कटू वाटणारा हा अहवाल भले आपण नाकारू आणि त्यासाठी संबंधितांना खडे बोल सुनावूदेखील. तसे खडसावल्याबद्दल समाजमाध्यमात उदोउदोही करवून घेता येईल! पण प्रत्यक्ष जमिनीवर दिसणारे हे वास्तव कसे नाकारणार? खरे तर काय काय नाकारणार हा खरा गंभीर प्रश्न!! पर्यावरणाच्या अहवालाने तो पुन्हा समोर येतो.

• • •

## एसटी कर्मचाऱ्याचा डेपोतच आत्महत्येचा प्रयत्न; संपात सामील झाल्याने त्रास वरिष्ठ त्रास देत असल्याचा आरोप

उल्हासनगरजवळील विठ्ठलवाडी एसटी डेपोमध्येच एका एसटी कर्मचाऱ्याने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. ही घटना घडली तेव्हा हा कर्मचारी कामावर होता. सचिन कदम असे या कर्मचाऱ्याचे नाव आहे. तो या आगारात मेकॅनिक म्हणून काम करतो. या घटनेनंतर खळबळ उडाली आहे. एसटी संपात सचिन कदमदेखील सहभागी झाले होते. त्याच रागातून आगारातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सचिन यांना त्रास दिला जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे. या त्रासाला कंटाळून अखेर सचिन ने झोपेच्या प्रमाणापेक्षा जास्त गोळया खाऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. त्याआधी त्रास देणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव नमूद करत पत्र लिहीले होते. सचिनसह इतर कर्मचाऱ्यांनादेखील याच कारणावरून त्रास दिला जात असल्याचा आरोप होत आहे. गेल्या अनेक दिवसांपासून मेकॅनिक विभागाचे वरिष्ठ अधिकारी संपात सहभागी झाल्याचा राग मनात धरून सचिन यांना मानसिक त्रास देतात असा आरोप एसटी कर्मचाऱ्यांनी केला आहे. हा मानसिक त्रास सहन न झाल्याने अखेर सचिन यांनी आत्महत्येचा प्रयत्न केला असल्याचा दावा त्यांनी केला. सचिन कदम यांनी झोपेच्या गोळया घेत आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला असल्याची बाब इतर एसटी कर्मचाऱ्यांच्या लक्षात आली. त्यांनी तात्काळ सचिन कदम यांना उल्हासनगरमधील रुग्णालयात दाखल केले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहे. सचिन कदम यांचा मानसिक छळ करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी एसटी कर्मचाऱ्यांनी केली आहे.




विलीनीकरण, वेतनवाढ व इतर मागण्यांसाठी एसटी कर्मचाऱ्यांनी पाच महिन्यांहून अधिक काळ संप केला. कमी आणि अनियमित वेतनामुळे काही कर्मचाऱ्यांनी आत्महत्या केली आहे. या आत्महत्यांच्या घटनांमुळे मोठी नाराजी कर्मचाऱ्यांमध्ये होती. एसटी संप मागे घेतल्यानंतर एसटी सेवा सुरळीत होत असताना या घटनेने पुन्हा एकदा खळबळ उडवली आहे.

# वाहनचालकांमध्ये फिल्मी स्टाईल राडा; चाकू हल्ल्याचा थरार सीसीटीव्हीत कैद

वैजापुर शहरातील हायवे चौफुलीवर असलेल्या एका पेट्रोल पंपावर धक्कादायक घटना समोर आली आहे. दोन ट्रक चालकांनी फिल्मी स्टाइल राडा घालत चक्क टॉमी व चाकू हल्ला केल्याचा प्रकार समोर आला आहे. या चाकू हल्ल्यात एक जण गंभीर जखमी झाला आहे. हा सर्व थरार पेट्रोल पंपावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. तर किरण काकासाहेब शिंदे (वय 21) असे चाकू हल्ल्यात जखमी झालेल्या वाहन चालकाचे नाव आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, किरण हा ट्रक चालक असून, शुक्रवारी रात्री वैजापूर शहरातील गंगापुर चौफुलीवरील एका हॉटेल मध्ये जेवण करण्यासाठी थांबला होता. जेवण झाल्यानंतर हॉटेलच्या बाजूलाचा पेट्रोल पंप असल्याने गाडीत डीझेल भरण्यासाठी तो तिथे गेला. त्यावेळी पंपावर एका वाहनात डीझेल भरणं सुरु होते. मात्र डीझेल भरल्यानंतरही संबधित वाहनचालकाने ट्रक बाजूला घेतला नाही. त्यामुळे उभा असेलला ट्रक बाजूला घेण्याची विनंती किरण याने त्या वाहनचालकाला केली. परंतु वाहन बाजूला न घेता समोरच्या वाहन चालकाने शिवीगाळ केल्याने दोघांमध्ये शाब्दीक वाद सुरु झाला.

थेट चाकू हल्ला!

त्यांनतर वाद एवढा वाढला की, समोरच्या वाहन चालकाने टॉमीने व दुसऱ्याने चाकूने किरणवर हल्ला केला.चाकू हल्ल्यानंतर किरण जागेवर कोसळला. त्यामुळे गंभीर जखमी झालेल्या किरणला सुरवातीला वैजापुरच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र,त्याला अस्वस्थ वाटत असल्याने पुढील उपचारासाठी त्याला औरंगाबादच्या एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर किरण यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एक वाहन चालक व त्याच्या सोबत असलेल्या असे दोन अनोळखी व्यक्तिविरोधात शिविगाळ करून जीवघेणा हल्ला केल्याप्रकरणी वैजापुर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटना सीसीटीव्हीत कैद...

पेट्रोल पंपावर दोन्ही वाहनचालकांमध्ये डीझेल भरण्याच्या वादावरून झालेल्या हाणामारीची घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. ज्यात किरणला आरोपींकडून होत असलेली मारहाण स्पष्ट दिसत आहे. तर यावेळी तिथे उपस्थित काही लोकांकडून वाद सोडवण्याचा प्रयत्न सुद्धा केला जात होता. मात्र मारहाण करणारा वाहनचालक आणि त्याचे साथीदार काही ऐकण्याच्या मनस्थितीत नसल्याचे दिसत होते.

# शिर्डीमध्ये 40 लाखांचा हनीट्रॅप

अहमदनगर - जिल्ह्यात पुन्हा एकदा हनी ट्रॅपचा प्रकार समोर आला आहे. एका श्रीमंत बागायतदाराकडून उसनवारी घेतलेले पैसे परत करण्याच्या बहाण्याने बोलवत महिलेने अश्लिल व्हिडिओ आणि फोटो काढले.



त्यानंतर बागायतदाराला लाखोंनी लुटत ब्लॅकमेल केल्याची धक्कादायक घटना शिर्डीत घडली आहे. पोलिसांनी आरोपी महिलेस ताब्यात घेतले आहे. तर त्यानंतर दुसऱ्या आरोपीसही अटक करण्यात आली आहे. ... असे अडकवले जाळयात - 2018 साली पीडीत बागायतदाराने आरोपी अनिता गोसावी यांना काही रक्कम उसनवारी दिली होती. मात्र संबधित महिला उसनवारी घेतलेले पैसे देण्यास टाळाटाळ करत होती. तगादा लावल्याने अखेर एक दिवस पैसे परत करण्याच्या बहाण्याने आरोपी महिलेनं पीडित बागायतदाराला राहाता तालुक्यातील बाभळेश्वर याठिकाणी बोलवले. रस्त्यावर पैसे कसे मोजणार म्हणून एक हॉटेलच्या रुममध्ये नेले. आरोपी महिलेने स्वतःचे वस्त्र काढून टाकले. याचवेळी पाठीमागून आलेल्या आरोपी राजेंद्र गिरी याने संबधित घटनेचे चित्रीकरण आणि छायाचित्र काढले. त्यानंतर दोघांनी मिळून पीडित व्यक्तीकडे रकमेची मागणी करण्यास सुरुवात केली. पैसे दिले नाही तर संबंधित व्हिडिओ सार्वजनिक करण्याची धमकी दिली. पीडित व्यक्तीने अब्रूला घाबरत सुरुवातील 40 लाख 50 हजार रुपये दिले. मात्र त्यानंतर देखील ब्लॅकमेलिंगचा सिलसिला सुरुच राहिला.अखेर बागायतदाराची पोलिसांत धाव - आरोपी महिलेने चार लाख रुपयांची आणखी मागणी केल्याने पीडित बागायतदाराने पोलिसात धाव घेतली. तिथे त्याने सर्व प्रकार सांगत तक्रार अर्ज दाखल केला. शिर्डी पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखत खात्री करण्यासाठी प्री ट्रॅप पंचनामा तयार केला. पन्नास हजार रुपयांच्या खऱ्या नोटा आणि बंडलच्या खाली साधे कागद असे चार लाख रुपये तयार केले. शिर्डीतील हॉस्पिटल रोडवर पैसे घेण्यासाठी महिलेला बोलावले. संबंधित महिला घटनास्थळी आली तेव्हा ट्रॅप लावून पोलिसांनी तिला रंगेहाथ पकडले. शिर्डीतील साईबाबा हॉस्पिटल येथील रोडच्या कडेला पोलिसांनी सापळा रचला. तसेच फिर्यादी चार लाख रुपये घेऊन त्या ठिकाणी पोहचला. महिलेने ते सर्व पैसे ताब्यात घेत आखणी 40 लाख रुपयांची मागणी केली. पैसे दिले तर हे सर्व प्रकरण मिटेल आणि व्हिडिओ आणि फोटो परत करु, असे म्हटले. त्याचवेळी पोलिसांनी आरोपी महिलेस सरकारी पंचासमोर ताब्यात घेतले. तर त्यानंतर शोधाशोध करुन दुसरा आरोपी राजेंद्र गिरी याला देखील अटक करण्यात आली.

## गुजरातमध्ये दोन समाजांमध्ये संघर्ष, दगड- विटांचा पडला खच.. कॉन्स्टेबलसह चार जण जखमी



आणंद ( गुजरात ) : गुजरातमधील आणंद जिल्ह्यात जातीय संघर्षात एक पोलीस हवालदार आणि अन्य तीन जण जखमी झाले आहेत. एका अधिकाऱ्याने रविवारी ही माहिती दिली. ते म्हणाले, शनिवारी रात्री बोरसद शहरात वादग्रस्त भूखंडावरून झालेल्या हाणामारीच्या संदर्भात पोलिसांनी 14 जणांना अटक केली आहे. पोलिस उपअधीक्षक डी.आर. पटेल म्हणाले की, जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी ५० अश्रुधुराच्या गोळ्या आणि ३० रबर गोळ्या झाडल्या. पोलीस बंदोबस्त तैनात : ते म्हणाले की, शहरात प्रचंड सुरक्षा दल तैनात करण्यात आले असून, परिस्थिती नियंत्रणात आहे. त्यांनी सांगितले की, शनिवारी रात्री 9.30 च्या सुमारास एका समाजाचे काही लोक वादग्रस्त भूखंडावर विटा टाकत होते. इतर समाजाच्या काही लोकांनी याला विरोध केला. त्यानंतर दोन्ही बाजूंमध्ये हाणामारी सुरू झाली. नंतर वाद इतका वाढला की, दोन्ही बाजूंनी एकमेकांवर दगडफेक सुरू केली. ते म्हणाले की, माहिती मिळताच स्थानिक पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी दोन्ही समाजातील लोकांना शांतता राखण्याचे आवाहन केले. पटेल म्हणाले की, दोन्ही समुदायांचे लोक एकमेकांवर भिडले आणि दगडफेक करू लागले. या हिंसाचारात एक पोलीस हवालदार आणि अन्य एका व्यक्तीवर चाकूने वार करण्यात आले आणि अन्य दोघे जखमी झाले. दंगलखोरांना पांगवण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या आणि रबराच्या गोळ्या झाडल्या, असे ते म्हणाले. पोलीस हवालदार गंभीर जखमी झाला असून, त्याला आणि इतर तीन जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, असे अधिकाऱ्याने सांगितले. हिंसाचाराच्या संदर्भात आतापर्यंत किमान 14 जणांना अटक करण्यात आली आहे, असे ते म्हणाले. पोलिसांनी शहरातील 15 संवेदनशील ठिकाणे ओळखली असून, तेथे कडक बंदोबस्त तैनात केला आहे. राज्य राखीव पोलीस दलाच्या (एसआरपी) दोन कंपन्यांनाही बाधित भागात सुरक्षेसाठी पाचारण करण्यात आल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

# पिंपळनेर परिसरात शेतमालाची चोरी करणारी टोळी अखेर जेरबंद; 4 लाख 20 हजार रुपयांचा शेतमाल

पिंपळनेर (धुळे) : पिंपळनेर परिसरात सोयाबीन, वरई अर्थात भगर या शेतमालाची चोरी करणाऱ्या चार जणांच्या टोळीचा धुळे जिल्ह्यातील पिंपळनेर पोलिसांनी छडा लावून त्यांना अटक केली आहे. त्यांच्याकडील मुद्देमालदेखील त्यांनी ताब्यात घेतला आहे. या टोळीकडून साधारणतः ४ लाख २० हजार रुपये किमतीचा ७० क्विंटल माल पोलिसांनी जप्त केलाय. या जप्त केलेल्या मुद्देमालात ६५ क्विंटल सोयाबीन, ५ क्विंटल वरई (भगर) चा समावेश आहे.

गुन्हेगार करीत होता या मालाची चोरी : सोयाबीन, वरई अर्थात भगर या शेतमालाची चोरी करणाऱ्या चार जणांच्या टोळीचा धुळे जिल्ह्यातील पिंपळनेर पोलिसांनी छडा लावून त्यांना अटक केली आहे. या टोळीकडून साधारण: ४ लाख २० हजार रुपये किमतीचा ७० क्विंटल माल पोलिसांनी जप्त केलाय. या जप्त केलेल्या मुद्देमालात ६५ क्विंटल सोयाबीन, ५ क्विंटल वरई (भगर) चा समावेश आहे.




पोलिसांना मिळाली होती माहिती : धुळे जिल्ह्यातील साक्री, पिंपळनेर भागात शेतमाल चोरी होत असल्याची तक्रार पोलीस स्टेशनला करण्यात आली होती. शेतमालाची चोरी करणारे चोर एकांतात असलेल्या गोडावूनमधून, आवारातून शेतमाल चोरी करीत असल्याचे पोलिसांच्या निर्दशनास आलं. तपास सुरू असताना पिंपळनेर पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली की, साक्री तालुक्यातील बोढरीपाडा येथील २६ वर्षीय रणजीत योहान देसाई हा त्याच्या साथीदारांमार्फत सोयाबीन चोरी करीत असल्याची माहिती मिळाली.गुन्हेगारांची नावे पुढीलप्रमाणे : त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेत विचारपूस केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. यात बोढरी पाडा येथील ४५ वर्षीय रुवाजी गेंदा गावीत, वार्सा येथील २३ वर्षीय किरण ईश्वर वळवी, साक्री तालुक्यातील नांदरखी येथील २४ वर्षीय दावित वन्या राऊत अशांनी मिळून ही चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितलं. पोलिसांनी आरोपींना बाजारात विकलेली ६५ क्विंटल सोयाबीन, ५ क्विंटल वरई (भगर) असा एकूण ४ लाख २० हजार रुपये किमतीचा शेतमाल जप्त केला. या टोळीनं धुळे जिल्ह्यात तसेच शेजारच्या जिल्ह्यात आणखी कुठे कुठे चोरी केली याचा तपास पोलीस करीत आहेत. चोरीस गेलेला शेतमाल परत मिळाल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केलंय. शेतमालाची चोरी होत असल्यानं शेतकऱ्याची चिंता वाढली होती.

## दाजीचे मेहुणीसोबत अनैतिक संबंध, तिची केली हत्या...नंतर रचला बनाव



नाशिक - जमिनीच्या वादातून टोळक्याने महिलेची हत्या करून घरदेखील पेटून दिल्याचा बनाव आरोपीने केला होता. आरोपीनेच याबाबतची तक्रार पोलीस स्टेशनला दिली होती. मात्र, पोलिसांनी खाक्या दाखवताच आरोपीने घडलेला प्रकार पोलिसांना सांगितला. हत्या केलेली महिला ही आरोपीची मेहुणी होती. आरोपीचे आधीच लग्न झाले होते. त्याला दोन मेहुणी असून, त्यातील पहिल्या मेहुणीसोबतही त्याने लग्न केले होते. तसेच दुसऱ्या मेहुणीसोबत त्याचे अनैतिक संबंध होते. अनैतिक संबंधातून लग्नाचा तगादा लावल्याने दाजीनेच मेहुणीची हत्या केल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील अधरवड येथील कातकरी वस्तीमधील हा प्रकार आहे. शरद महादू वाघ असेत्या आरोपीचे नाव आहे. सुरुवातीला असा केला होता बनाव - पहाटे तीन वाजेच्या सुमारास 10 ते 15 लोकं जुन्या जमिनीच्या वादासाठी घरी आले होते. यावेळी त्यांनी घरे जाळली तसेच महिलेची त्या जमावाकडून हत्या करण्यात आली आहे. तसेच कातकरी कुटुंबांची तीन घरे जाळून टाकण्यात आली. याबाबतची तक्रार शरद महादू वाघ याने घोटी पोलीस ठाण्यात दिली होती. या घटनेचा पोलिसांनी खोलवर तपास केल्यानंतर तक्रारदारच आरोपी असल्याचे उघड झाले आहे. अनैतिक संबंधातून लग्नाचा तगादा लावल्याने दाजीने मेहुणीची हत्या केल्याचे निष्पन्न झाले आहे. अनैतिक संबंधातून हत्या - आरोपी शरद वाघ हा इगतपुरी तालुक्यातील अधरवड येथील कातकरी वस्तीमध्ये राहतो. शरद वाघ याचे दोन लग्न झाले आहेत. पत्नी असताना त्याने एका मेहुणीशी लग्न केले आहे. त्यात गेल्या वर्षभरापासून त्याचे दुसऱ्या घटस्फोटीत असलेल्या मेहुणीशीही अनैतिक संबंध होते. तिने शरदकडे लग्न करण्याचा तगादा लावला होता. मात्र, तिसऱ्या लग्नाला शरद याचा नकार होता. अशात दुसऱ्या मेहुणीने घर जाळण्याची धमकी देत घर पेटून दिले. या घटनेचा राग आल्याने शरदने शस्त्राने दुसऱ्या मेहुणीच्या गळयावर वार करून तिची हत्या केली. नंतर घाबरलेल्या शरदने हा प्रकार उघड होऊ नये यासाठी जमावावे लक्ष्मीची हत्या केली असल्याचा बनाव तयार केला होता.

## प्रियकराकडून अल्पवयीन प्रेयसीची हत्या; आरोपीला पोलिसांकडून अटक



ठाणे : शिवाजीनगर भिवंडी परिसरामध्ये प्रेम प्रकरणातून अल्पवयीन प्रेयसीची प्रियकराकडून धारदार शस्त्राने खून करण्यात आल्याची घटना शुक्रवार दिनांक 10 जून रोजी सायंकाळी घडली असून, प्रियकर आरोपीला देवनार पोलिसांनी अटक केली आहे. आरोपी विरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला न्यायालयासमोर हजर केले असता, पोलीस कोठडी देण्यात आली आहे.प्रियकराने नैराश्यातून प्रेयसीवर केला हल्ला : शिवाजीनगर गोवंडीच्या झाकीर हुसेन परिसरात राहणाऱ्या अल्पवयीन मुलीचे त्याच परिसरात राहणाऱ्या एकाशी प्रेम होते. काही दिवसांपूर्वी त्यांनी एकमेकांपासून फारकत घेतली. त्यामुळे नैराश्य आलेल्या प्रियकराने शुक्रवारी सायंकाळी धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला करून पळ काढला. देवनार पोलिसांना याविषयी माहिती मिळताच त्या ठिकाणी धाव घेत जखमी प्रेयसीला उपचारासाठी घाटकोपरच्या राजावाडी रुग्णालयात नेले. तेथे दाखल करण्यापूर्वीच तिला मृत घोषित करण्यात आले. स्थानिकांनी दिलेल्या माहितीच्या आधारे आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून पुढील कारवाई चालू आहे.

पालघर येथेसुद्धा प्रियकराकडून प्रियसीची हत्या घडली होती : अत्यंत धक्कादायक बाब या घटनेत समोर आली होती. प्रियकराने प्रेयसीला मारून भिंतीत पुरून ठेवले होते. आणि त्याच घरात तो राहत होता. वाणगाव येथील वृंदावन दर्शन अपार्टमेंट इमारतीतील सदनिकेत भिंतीआड दडवून ठेवलेला एका तरुणीचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळून आला होता. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. प्रेमविवाहासाठी घरातून पळून गेलेल्या एका बेपत्ता तरुणीचा शोध घेत असताना ही धक्कादायक बाब उघड झाली आहे. प्रियकरानेच प्रेयसीची हत्या करून तिचा मृतदेह इमारतीच्या सदनिकेत भिंतीआड दडवून ठेवला होता. हत्येच्या आरोपाखाली तरुणीच्या प्रियकराला पोलिसांनी ताब्यात घेतले होते.

## ठाण्यात तरुणाने स्वतःला जाळून घेण्याचा केला प्रयत्न, मालमत्तेच्या वादातून घडली घटना



ठाणे - मुंब्रा पोलीस ठाण्याच्या समोर असलेल्या दुकानाच्या मालमत्तेच्या वादातून बाप आणि मुलाच्या भांडणात लहान मुलगा मनोज चौरासिया याने पोलिसांसमोर स्वतःला जाळून घेण्याचा प्रयत्न केल्याची घटना शनिवारी संध्याकाळी घडली. अत्यवस्थ मनोज चौरसिया याला केइएम रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात आले. याबाबतची हकीकत अशी की, मुंब्रा परिसरात अर्जुन चौरसिया यांचे दुकान आहे. या दुकानाच्या कब्जाबाबत अर्जुन चौरसिया आणि दोन मुले अशोक आणि मनोज यांच्यात वाद होता. सदर प्रकरणी अर्जुन चौरसिया याने काही लोकांना हाताशी धरून दुकानाचा ताबा दुसऱ्याला दिला. वाद हा सहाय्यक पोलीस आयुक्त व्यंकटेश आंधळे यांच्याकडे गेल्यानंतर त्यांनी कायदेशीर कार्यवाही कारून प्रकरण दिवाणी न्यायलयात पाठविले होते. दिवाणी न्यायलयात प्रकरण सुरू आहे. दरम्यान पिता अर्जुन आणि लहान मुलगा यांच्यात पुन्हा दुकानाच्या कब्जाबाबत वाद शनिवारी उफाळून आला. दरम्यान लहान मुलगा मनोज याने दुकानात घुसून तोडफोड करीत दुकानात आलेल्या पोलिसांसमोरच स्वतःवर रॉकेल टाकून पेटवून घेत आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. यामुळे मनोज हा जास्त भाजला. त्याची प्रकृती गंभीर असून त्याला मुंबईच्या केइएम रुग्णालयात पाठविण्यात आलेले आहे.आत्मदहनाचा प्रयत्न केल्यानंतर भाजलेल्या अवस्थेत असलेल्या मनोजने रुग्णवाहिकेत बसून उपचारासाठी जाण्यास नकार दिला. मात्र जबरदस्तीने त्याला उपचारासाठी पाठविण्यात आले. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार पिता-पुत्र यांचा वाद पूर्वीच झाला होता. असाच प्रयत्न करण्याचा प्रकार हा मनोजने केला होता, मात्र त्याला स्थानिकांनी आणि पोलिसांनी समजावले आणि प्रकरण हे न्यायालयात गेले असून त्यावर लवकर निर्णय आला पाहिजे असे मत स्थानिकांनी वक्त केले. शनिवारी हा वाद पुन्हा उफाळून आला आणि ही घटना पोलिसांसमोरच घडली असे असले तरी बातमी लिहेपर्यंत गुन्हा दाखल करण्यात आलेला नव्हता.

# कल्याणमध्ये पदपथांवरील बेकायदा टपऱ्या

## निवारे हटविण्याची मोहीम ; डोंबिवलीत कारवाई ठप्प

कल्याण- पावसाळ्यात पादचाऱ्यांना रस्ते, पदपथावरून चालताना कोणताही अडथळा येऊ नये म्हणून कल्याणमध्ये प्रभाग हद्दीतील पदपथांवरील टपऱ्या, निवारे जमीनदोस्त करण्याची कारवाई साहाय्यक आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आली आहे. या कारवाईमुळे रहिवाशांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. अशा प्रकारची कारवाई डोंबिवलीतील फ, ग, ह आणि ई प्रभागातील साहाय्यक आयुक्त कधी सुरू करणार, असे प्रश्न रहिवासी, पादचारी उपस्थित करत आहेत. डोंबिवलीतील साहाय्यक आयुक्त विकासकांच्या आदेशावरून फक्त अतिधोकादायक इमारतीच तोडत राहणार का. बेकायदा इमारती तोडण्याऐवजी अशा इमारतींच्या सर्व्हेक्षणात अधिकारी वेळ घालवित आहेत. त्यांनीही डोंबिवली पूर्व, पश्चिम भागातील पदपथ, मुख्य रस्त्यांना अडसर ठरणारी पदपथांवरील बेकायदा टपऱ्या, निवारे जमीनदोस्त करावेत, अशी रहिवाशांची मागणी आहे. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी पावसाळया पूर्वीच्या उपाय योजनांचा भाग म्हणून पदपथ नागरिकांना चालण्यासाठी मोकळे करण्याचे आदेश प्रभागातील साहाय्यक आयुक्तांना



दिले आहेत. या आदेशाप्रमाणे कल्याणमधील साहाय्यक आयुक्तांनी पदपथांवरील अतिक्रमणे हटविण्याची जोरदार मोहीम सुरू केली आहे. डोंबिवलीतील ग प्रभागाचे साहाय्यक आयुक्त राजेश सावंत, ह प्रभागाचे साहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील, फ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त संजय जाधव, ई प्रभागाचे भारत पवार यांनाही आयुक्तांनी पदपथ, रस्त्यांवरील अतिक्रमणे करण्यासाठी आदेशित करण्याची मागणी रहिवासी करत आहेत. कल्याण पश्चिमेतील क प्रभाग हद्दीत साहाय्यक आयुक्त सुधीर मोकल यांनी संदीप हा ॅटेल ते छत्री बंगला भागातील रस्ता रुंदीकरणात बाधित होणारी ११ बांधकामे जमीनदोस्त केली. कल्याण बस आगारा समोरील टपऱ्या, हातगाड्या तोडून टाकल्या. कल्याण पूर्वेतील जे प्रभागाच्या साहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांनी कचोरे भागातील स्मशानभूमीच्या आरक्षित भूखंडावर उभारलेली बेकायदा बांधकामे तोडून टाकली. याच भागात उभारण्यात आलेल्या चाळी जमीनदोस्त केल्या. ९० फुटी रस्त्यावर गावदेवी मंदिर ते लक्ष्मी कृपा सोसायटी परिसरातील पदपथ फेरीवाल्यांनी व्यापले आहेत. पादचाऱ्यांना या रस्त्यावरून चालत येत नाही. याविषयी अनेक तक्रारी रहिवाशांनी फ प्रभागाकडे केल्या आहेत. त्याची दखल घेतली जात नाही, असे रहिवाशांचे म्हणणे आहे.

# डोंबिवलीत घातक पान मसाला विक्रेत्यावर कारवाई

डोंबिवली- शासन आदेशानुसार गुटखा सदृश्य प्रतिबंधित असलेल्या सर्व घातक पान मसाला वस्तुंच्या विक्रीवर बंदी आहे. अन्न आणि प्रशासन विभाग अशा वस्तूंची विक्री होणार नाही याची काळजी घेतो. असे असताना डोंबिवली पश्चिमेतील एका पान टपरी चालक खाण्यासाठी अयोग्य असलेला प्रतिबंधित विमल पान मसाला वस्तू टपरीवर विक्री करताना आढळून आला. विष्णुनगर पोलिसांनी या विक्रेत्या विरुध्द फौजदारी कारवाई केली आहे. या टपरी चालकाकडून विमल पान मसाल्याच्या सतराशे रुपये किमतीच्या पुड्या पोलिसांनी जप्त केल्या. सुधाकर लकप्पा शेट्टी (६६, श्री अंबिका पान शा ॅप




व जनरल स्टोअर्स) असे टपरी मालकाचे नाव आहे. विष्णुनगर पोलीस ठाण्यातील पोलीस श्रीराम मिसाळ यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवून घेण्यात आला. महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार आरोग्यास घातक होईल अशा पान मसाला वस्तू विक्री, वाहतूक आणि खाण्यास प्रतिबंध आहे. या उत्पादनांवर राज्यात बंदी घालण्यात आली आहे. असे असताना काही विक्रेते बाहेरील राज्यातून घातक पान मसाल्याच्या वस्तू गुप्त मार्गाने आणून त्या चोरून आपल्या टपरीत विकत आहेत. अशाप्रकारे विष्णुनगर पोलीस ठाणे हद्दीत श्री अंबिका शा ॅप दुकानाचा मालक सुधाकर शेट्टी बंदी असलेला विमल पान मसाला ग्राहकांना विकत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी बनावट ग्राहक पाठवून त्याची खातरजमा केली. त्यांना घातक पान मसाला शेट्टी विकत असल्याचे आढळले. पोलिसांनी त्याच्या टपरीवर छापा टाकून सतराशे रुपयांच्या विमल पान मसाल्याच्या पुड्या जप्त केल्या. अन्न आणि सुरक्षा मानके कायद्यानुसार सुधाकर शेट्टी याच्यावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्कः-9594418181 / 8424989898